महाराष्ट्र शासन
# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रत्नागिरी
Government Medical College, Ratnagiri
होडेकर रोड, उद्यमनगर, पटवर्धन वाडी, रत्नागिरी - ४१५६१२
दुरध्वनी क्र. ०२३५२-२४४३५५ ईमेल: deangmcratnagiri@gmail.com

जा.क्र.शावैमर /खरेदी विभाग/१५३३ / २०२५ दिनांक:- २१/०७/ २०२५

## दरपत्रक

प्रति,

१.

२.

३.

४.

५.

**विषय:-** दरपत्रक मोहोर बंद लिफाफा सादर करणेबाबत...

**संदर्भ:-** १) उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३/उद्योग-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६

२) उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र. भांखस-२०२१/प्र.क्र.८/उद्योग- दिनांक ०७ मे, २०२१.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रत्नागिरी या संस्थेतील मुला-मुलींच्या वसहतीगृहात बेड (गादी व उशी) आवश्यकता आहे. त्याकरीता सदरहू १०० बेड (गादी व उशी) तातडीने खरेदीसाठी विहीत पध्दतीने दरपत्रक प्रक्रिया करुन दरपत्रक मोहोरबंद लिफाफे मागविण्यात येत आहे. दरपत्रक धारक या कार्यालयास मागणी केलेल्या १०० बेड (गादी व उशी) बाबी पुरवठा करण्यास इच्छुक असल्यास विर्निष्टानुसार आपला दरपत्रक मोहोरबंद लिफाफा विहीत मुदतीत या कार्यालयाच्या आवक शाखेत खालील अटी व शर्तीनुसार सादर करावा.

| अ.क्र. | वस्तुचे नाव | विनिर्दिष्ट | एकूण नग (करासहित) | एकूण नगांची किंमत (करासहित) |
|---|---|---|---|---|
| १ | खॉट | Size -3 6<br>(1.25" Round pipe used for Foot & Back rest, ¾" x 1.5" square pipe used for frame, ¾"ms flat used for top side, ¾" Angle used for middle support for ms flat, powder coating finished, CRC pipe used) | | |
| २ | गाद्या | Size - 3 x 6<br>( Box type, 4" thick, pure white cotton used with cloth for surface area.) | | |

AnyScanner

अटी व शर्ती:-

१) दरपत्रक मोहोरबंद लिफाफा दिनांक २८/०७/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत कार्यालयास पोहचतील या बेताने पाठवावे. जाहीर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही/ ग्राह्य धरले जाणार नाही.

२) सूचना फलक/संस्थेच्या संकेतस्थळावर जाहीर नोटीसप्रमाणे इच्छुक कंपनीस देखील दरपत्रक मोहोरबंद लिफाफा सादर करण्याची मुभा देण्यात येत आहे.

३) दरपत्रक मोहोरबंद लिफाफे ही दिनांक २८/०७/२०२५ रोजी दुपारी ठीक १२.०० वाजता मा. अधिष्ठाता यांच्या दालनात संस्थास्तरावर गठीत खरेदी समितीसमोर उघडण्यात येतील. आपणास जर दरपत्रक मोहोरबंद लिफाफे उघडण्याच्या प्रक्रियेत सहभाग घ्यावयाचा असल्यास नियोजित वेळेत स्वखर्चाने उपस्थित राहावे.

४) दरपत्रकातील दर हे दिनांक ३१/०५/२०२६ पर्यंत ग्राह्य राहतील. करीता आपणास ग्राह्य दरानेच वस्तुंचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. दरपत्रक ग्राह्य कालावधी हा पुरवठा आदेश नोंदविल्याच्य दिनांकापासून ११ महिन्याचा राहील.

५) प्रस्तावित दरपत्रकात आकारण्यात आलेले दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत. सर्वात कमी दराचे दरपत्रक व वस्तुंचा दर्जा/ गुणवत्ता उत्कृष्ठ असेल, अशाच दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

६) मागणी केलेल्या बाबींची किंमत, जीएसटी कर व एकूण किंमत असे स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावी . दरपत्रकात खाडाखोड करण्यात येवू नये.

७) दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यात सादर करावयाचे दस्तऐवज ( Document ) :- अधिकृत लेटरहेडवर दरपत्रक सादर करावे.

१) दुकानाचा परवाना /व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र
२) पॅन कार्डची प्रत
३) जी.एस.टी. प्रमाणपत्र ,
४) आयकर विवरणपत्र
५) इतर आस्थापनांकडे केलेले पुरवठा आदेश

९) **पुरवठा ( Delivery ) :-** पुरवठा आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसात पुरवठा करण्यात यावा. सदर पुरवठा आदेश दिल्यानंतर दरपत्रक तसेच पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार सेवेचा पुरवठा विहित मुदतीत करणे आपणावर बंधनकारक राहील. विहित मुदतीत समाधानकारक व विनिर्दिष्ठेनुसार साहित्य पुरवठा न केल्यास द्वितीय न्युनतम दरपत्रकधारकास पुरवठा आदेश देण्यात येतील.

१०) **देयकाची अदायगी :-** वस्तु प्राप्त झाल्यानंतर संबंधित पुरवठादारास उपलब्ध अनुदानानुसार देयकाची अदायगी करण्यात येईल. यशस्वी दरपत्रकधारकास आगाऊ रक्कम अदा करण्यात येणार नाही. अपवादात्मक परिस्थितीमुळे देयक अदा करण्यास विलंबपोटी कोणत्याही स्वरुपाचे व्याज अथवा अतिरिक्त शुल्क/रक्कम हे कार्यालय अदा करणार नाही.

११) अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटीत आवश्यकतेनुसार अंशत: बदल करणे, अथवा प्राप्त झालेले दरपत्रके कोणतेही कारण न देता स्वीकारणे/नाकारणे, तसेच कोणत्याही स्तरावर खरेदी प्रक्रिया रद्द करणे इ. अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रत्नागिरी) यांनी राखून ठेवलेले आहेत.

( डॉ. जयप्रकाश रामानंद )
**अधिष्ठाता**
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
रत्नागिरी

SCAN AnyScanner